महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय– उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु–मार्च २०२४ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

# प्र क ट न

फेब्रु–मार्च २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व दिव्लक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | बुधवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२४ ते शनिवार, दि. २३ मार्च २०२४ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | शुक्रवार दि. ०१ मार्च २०२४ ते शुक्रवार दि. २२ मार्च २०२४ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in संकेतस्थळावर दि. २८/०८/२०२३ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी–मार्च २०२४ च्या लेखी परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे.

सदर इ.१२वी व इ.१०वीच्या परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार आयोजित करण्यात येतील याची सर्व कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक व संबंधीत घटकांनी नोंद घ्यावी.

मंडळाच्या संकेतस्थळावरील संभाव्य वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ठ व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.

सदर वेळापत्रकांबाबत काही सूचना, हरकती असल्यास त्या विभागीय मंडळाकडे तसेच राज्य मंडळाकडे १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात पाठवाव्यात. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या सूचनांवर विचार केला जाणार नाही.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०८/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.

पत्र क्र.नाविमं/प.उ.मा./ 2981
नागपूर दि.28/08/२०२३

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये
नागपूर विभाग, नागपूर( भंडारा,चंद्रपुर,नागपुर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया.)

फेब्रु/मार्च २०२४ माध्यमिक शांलात प्रमाणपत्र ( इ. १० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ. १२ वी ) परीक्षा मुख्याध्यापक व प्राचार्य यांनी संभाव्य वेळापत्रकाबाबत उपरोक्त प्रकटनांची नोंद घेवुन कार्यवाही करावी.

( चिंतामण वंजारी )
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ,नागपूर